# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.01.2025** **वार-बुधवार**

---

**<u>संचलन</u>**

देशाची उत्तर सीमेवरील परिस्थिती स्थिर आहे परंतु संवेदनशील आहे. गलवान सीमेवरील घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी भारतीय सेना सतर्क आहे. सेना कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यास सज्ज आहे, असं प्रतिपादन लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज पुण्यात केलं. सत्त्याहताराव्या लष्कर दिनानिमित्त पुण्यातील बॉम्बे इंजिनियरींग ग्रुपच्या मैदानावर आयोजित संचलन कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. जम्मू काश्मीरच्या अंतर्गत भागात लष्कराच्या प्रयत्नांमुळे हिंसाचार कमी झाला असल्याचं सांगून जनरल द्विवेदी म्हणाले की या वर्षात लष्करातील तंत्रज्ञान अधिक अद्ययावत आणि आधुनिक करण्यावर भर दिला जाईल. संचलनाच्या आरंभी हवाई दलाच्या सुखोई विमानांनी मानवंदना दिली. मेजर जनरल अनुराग वीज यांनी संचलनाचं नेतृत्व केलं. चेतक, चीता आणि ध्रुव या हेलिकॉप्टर्सनी संचलना पथकांवर पुष्पवृष्टी केली. भारतीय तोफखाना, लष्कर पोलीस दलाचं महिला अग्नीवीर पथक आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या महिला पथकानं संचलनाच्या माध्यमातून महिला शक्तीचा नारा दिला. मद्रास रेजिमेंट, मराठा लाईट infantry दलाची पथकं यामध्ये सहभागी झाली होती. भारतीय लष्करात वापरली जाणारी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आणि उपकरणांनी संचलानाची शोभा वाढवली. यात मुख्य आकर्षण रोबोटिक म्युल संजय आणि नेपाळ लष्कराचा वाद्यवृंद यांचं होतं.

**<u>मांजा</u>**

पुणे शहरात नायलॉन मांजामुळं नागरिक, आणि पक्षी जखमी होण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनानं मांजाचा वापर करणाऱ्यांसह विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली. तीन दिवसांत महापालिकेच्या घनकचरा विभागानं ३४० ठिकाणी पाहणी करून १० जणांकडून २५ हजारांचा दंड वसूल केला, अशी माहिती घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली.

**<u>पुढे</u>**

भारतीय स्टार्टअप इकोसिस्टीमला प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय क्रीडा आणि युवक मंत्रालयाच्या वतीनं युवकांच्या सहभागाने उद्या आयोजित पदयात्रा पुढे ढकलण्यात आली असून सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी असं क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी सांगितलं.

**दफनभूमी**

पुण्यातील वडगावशेरी इथल्या दफनभूमीच्या नूतनीकरणाचं भूमीपूजन आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते आज झालं. हिंदू लिंगायत समाज, मुस्लिम समाज तसंच ख्रिश्चन समाजासाठी या दफनभूमीची सोय करण्यात आली आहे. यावेळी तिन्ही समाजाचे प्रमुख आणि नागरिक उपस्थित होते.

**पानिपत**

पानिपत युद्धाचा 265 वा स्मृतिदिन आणि पानिपतच्या युद्धात बलिदान देणाऱ्या मराठा वीरांना पुण्यात वानवडीमधील महादजी शिंदे छत्री इथं काल आदरांजली अर्पण करण्यात आली. सरदार महादजी शिंदे यांच्या मंदिरातील पुतळ्याला मान्यवरांकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन आणि पानिपतच्या पवित्र मातीचं कलशपूजन करण्यात आलं. या कार्यक्रमाचं आयोजन उत्तमराव शिंदे सरकार यांच्यावतीनं करण्यात आलं होतं.

**महावितरणआढावा**

महावितरण सोबतच वीजग्राहकांचंही आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त आणि सदोष वीजमीटर तातडीने बदलण्याचे निर्देश महावितरणचे अध्यक्ष - व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले. पुणे प्रादेशिक विभागातील विविध कामांच्या आढावा बैठकीत आज ते बोलत होते. नवीन वीजमीटर मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे नादुरुस्त, सदोष वीजमीटर तातडीने बदलण्याच्या सूचना त्याने दिल्या.

**बुद्धिबळ**

पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेनं खुल्या आणि कनिष्ठ गटाच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत आठ वर्षाखालील गटात पार्थ शिंदे, दहा वर्षाखालील गटात तीर्थ कोद्रे, 12 वर्षाखालील गटात हॉलडॉर्सोन कर्मा आणि 14 वर्षांखालील गटात भुवन कुन्नूर तर खुल्या गटात केवल निर्गुण हे विजेते ठरले. स्पर्धेत साडेतीनशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता तर यामध्ये 75 फिडे मानांकन असलेले आंतरराष्ट्रीय खेळाडू एकंदर आठ फेऱ्यांमध्ये सहभागी झाले होते. विजेत्यांना एक लाख रुपयांची पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

**<u>मॅरेथॉन</u>**

असोसिएशन फॉर डायबेटीज अँड ओबेसिटी रिव्हर्सल संस्थेच्या वतीनं पुण्यात अर्ध मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये दीपक कुमार आणि लावण्या ममार्डे विजेते ठरले. याव्यतिरिक्त दहा किलोमीटर गटात विकास इंगळे आणि पद्मा कारंडे, पाच किलोमीटर प्रकारात मोहित यादव आणि सारिका मुरकुटे हे विजयी ठरले. अंदाजे चार हजार नागरिक या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यात सोळाशेहून अधिक महिलांचा समावेश होता. आहारतज्ञ डॉक्टर जगन्नाथ दीक्षित यांनी मधुमेहींना आहाराविषयी मार्गदर्शन केलं.

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. उद्याही असंच हवामान राहून किमान 18 अंश तर कमाल 28 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**